ePaper
राष्ट्रपतींचा अपमान म्हणजे संविधानाचा अपमान; पंतप्रधान नरेंद्र मोदी

वर्ष - 9 वे | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 09 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 2 वरुन...

विद्यापीठासमोरचा दुमजली उड्डाणपूल सुरू

## भारताने वर्ल्डकप जिंकताच सर्व जल्लोषात मग्न, कर्णधार सूर्याने मानले खेळपट्टीचे आभार

# विश्वविजेता भारत..!

**महाईन्यूज** | अहमदाबाद

**अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या टी-२० विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव करून इतिहास घडवला. टीम इंडिया टी-२० विश्वचषक विजेतेपद सलग दुसऱ्यांदा जिंकणारा पहिला संघ ठरला. तसेच घरच्या मैदानावर संघाने टी-२० विश्वचषक विजेतेपद जिंकण्याची ही पहिलीच वेळ होती. टीम इंडियाच्या या ऐतिहासिक विजयानंतर भारतीय संघ जल्लोष करत असताना सूर्याने मात्र खेळपट्टीचे आभार मानले.**



अंतिम सामन्यात, प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने २० षटकांत पाच गडी गमावून २५५ धावा केल्या. प्रत्युत्तरात, किवी संघ १९ षटकांत १५९ धावांवर सर्वबाद झाला. टी२० विश्वचषक फायनलमध्ये धावांच्या बाबतीत हा सर्वात मोठा विजय आहे. भारताच्या टॉप तिन्ही फलंदाजांनी अर्धशतकी खेळी करत संघाच्या विजयाचा पाया रचला. यानंतर गोलंदाजीत अक्षर पटेल व जसप्रीत बुमराह यांनी एकत्र ७ विकेट्स घेत संघाच्या विजयाचा कळस चढवला.

बुमराहने १८व्या षटकात मिचेल सँटनरला क्लीन बोल्ड करत नववी विकेट मिळवली. यानंतर १९व्या षटकात अभिषेक शर्मा गोलंदाजीला आला. त्याच्या षटकातील अखेरच्या चेंडूवर विकेट मिळाल्याने न्यूझीलंड सर्वबाद झाला आणि अहमदाबादच्या मैदानावर विजयाचा जल्लोष सुरू झाला. सर्व जणांनी एकत्र गळाभेट करत जल्लोष केल्यानंतर सूर्या अचानक त्या विजयी घोळक्यात बाहेर आला. ज्या मैदानावर काही काळापूर्वी भारतीय क्रिकेट चाहत्यांच्या पदरी निराशा पडली होती, त्याच अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर आज टीम इंडियाने सोनेरी इतिहास रचला आहे. टी-२० विश्वचषक २०२६ च्या अंतिम युद्धात न्यूझीलंडचा पराभव करत भारताने तिसऱ्यांदा विश्वविजेतेपदावर आपले नाव कोरले आहे. तीन वेळा टी-२० विश्वचषक जिंकणारा भारत हा जगातील पहिलाच संघ ठरला असून, या विजयाने भारतीय क्रिकेटचा दबदबा पुन्हा एकदा सिद्ध केला आहे. सलग दोनदा विश्वविजेतेपद पटकावणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला आहे.

## विजयाचा तो 'अंतिम' क्षण

न्यूझीलंडच्या डावातील १९ व्या षटकात अभिषेक शर्माने टाकलेल्या सहाव्या चेंडूवर भारताच्या विजयावर अधिकृत शिक्कामोर्तब झाले. जॅकब डफीने मारलेला हवेतील फटका लाँग-ऑन सीमारेषेवर उभ्या असलेल्या टिळक वर्माने अत्यंत चपळाईने टिपला. सीमारेषेच्या अगदी जवळ असल्याने स्वतःचा तोल सावरण्यासाठी टिळकने चेंडू हवेत उडवला आणि मैदानाच्या आत पुन्हा तो सुरक्षित झेलला. जॅकब डफी बाद होताच अहमदाबादचे नरेंद्र मोदी मैदान 'इंडिया-इंडिया'च्या जयघोषाने दुमदुमले आणि भारतीय संघाच्या सर्वच खेळाडूंनी मैदानावरच जल्लोष सुरू केला.

## सूर्यकुमार यादवने मैदानाची माती डोक्याला लावत मानले आभार

सूर्याने घोळक्यातून बाहेर येत खाली वाकला. त्याने अहमदाबादच्या पिचवर हात फिरवला आणि ती माती त्याने आपल्या डोक्याला लावत त्या खेळपट्टीचे आभार मानले. सूर्याच्या या कृतीने सर्वांचं लक्ष वेधलं. रोहित शर्माने बार्बाडोसमधील विजयानंतर खेळपट्टीच्या मातीची चव चाखली होती. तर सूर्याने आता खेळपट्टीची माती डोक्याला लावत त्याचे आभार मानले.

# विद्यापीठासमोरचा दुमजली उड्डाणपूल सुरू

## वाहतूक कोंडीवर दिलासा; पायाभूत सुविधांच्या बळावर विकासाला गती

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्यासारख्या वेगाने विकसित होणाऱ्या शहरासाठी मजबूत पायाभूत सुविधा अत्यावश्यक असून शहराला वाहतूक कोंडीतून मुक्त करण्यासाठी शासनाकडून बहुआयामी नियोजन करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या समोरील एकात्मिक दुमजली उड्डाणपूलाचे लोकार्पण रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले.**



### या उड्डाणपूला बद्दल

- उड्डाणपुलाची एकूण लांबी (रॅम्पसह) १७६३.५२ मीटर आहे.
- प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता किंमत ₹२७७ कोटी आहे.
- औंध, बाणेर, पाषाण आणि शिवाजीनगर या प्रमुख मार्गांना जोडणारी रॅम्प व वाहतूक व्यवस्था करण्यात आली आहे. वाहतूक सुरळीत
- ठेवण्यासाठी ५५ मीटर लांबीचा स्टील गर्डर बसविण्यात आला आहे.

या प्रसंगी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महापौर मंजुषा नागपुरे, आमदार सिद्धार्थ शिरोळे, 'पीएमआरडीए'चे आयुक्त डॉ. योगेश म्हसे, पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी पी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, विद्यापीठ चौकातील जुना पूल पाडून नवीन दुमजली उड्डाणपूल उभारण्याचा निर्णय घेताना अनेक अडचणी आणि मतभेद होते; मात्र सर्वांना विश्वासात घेऊन आणि विविध पक्षांच्या नेत्यांचे सहकार्य मिळवून हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला. या प्रक्रियेत दिवंगत अजित दादांनी घेतलेला पुढाकार महत्त्वाचा होता, असे त्यांनी नमूद केले.

या प्रकल्पाच्या सुरुवातीच्या काळात काही माध्यमांनी आणि नागरिकांनी टीका केली होती; मात्र शहराच्या दीर्घकालीन हिताचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला होता. या संदर्भात अजित दादा एका भाषणात म्हणाले होते, 'आम्ही अभियंता नाही; मात्र अभियंत्यांनी दिलेल्या आराखड्यानुसार प्रकल्प वेगाने पूर्ण करणे हे आमचे काम आहे,' असे स्पष्टपणे सांगत हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आणि आज त्याचे सकारात्मक परिणाम पुणेकरांना दिसत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

पुणे हे देशातील सर्वात वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक असल्याचे सांगताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, माहिती व तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील मोठ्या वाढीनंतर आता पुणे 'ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स'चे (जीसीसी) महत्त्वाचे केंद्र बनत आहे. गेल्या वर्षभरात देशातील सर्वाधिक जीसीसी स्पेस पुण्यात विकसित झाली असून त्यामुळे शहराचे आर्थिक व औद्योगिक महत्त्व आणखी वाढले आहे. या विकासाला चालना देण्यासाठी मजबूत पायाभूत सुविधा उभारणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे काही मोठ्या शहरांच्या विकासाची गती मंदावल्याची उदाहरणे पाहायला मिळतात. त्यामुळे पुणे शहराला 'डी-कंजेस्ट' करणे हे शासनाचे प्राधान्य असल्याचे त्यांनी सांगितले. पुण्यात रस्त्यांसाठी उपलब्ध जागा मर्यादित असल्याने उड्डाणपूल, ग्रेड सेपरेटर, भुयारी मार्ग आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा विस्तार या माध्यमातून वाहतूक व्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्यात येत आहे.

पुण्यात वाहतुकीसाठी जमिनीवर, आकाशात आणि जमिनीखाली अशा तिन्ही स्तरांवर एकाच वेळी काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. यामध्ये पुणे व परिसरासाठी दोन चक्राकार मार्ग (रिंग रोड) प्रकल्प राबविण्यात येत आहेत. तसेच मेट्रोचे जाळे वेगाने विस्तारले जात असून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (पीएमपीएल) आणि इतर सेवांना बळ दिले जात असल्याचे श्री. फडणवीस यांनी सांगितले.

विद्यापीठासमोरील या उड्डाणपुलाला दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव देण्याबाबत व्यक्त झालेल्या भावना मान्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस यांनी या संदर्भात सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही दिली.

## चारशेहून अधिकमहिला शंख वादकांचा विश्वविक्रम; शंखनाद पथकाचा उपक्रम

**महाईन्यूज । पुणे**

**महिला शक्ती, परंपरा आणि सांस्कृतिक वारसा यांचा गौरव करण्यासाठी पुण्यामध्ये जागतिक महिला दिनानिमित्त महिलांच्या सन्मानार्थ तब्बल चारशेहून अधिक महिला शंख वादकांनी रविवारी एकत्रितपणे शंख वादन विश्वविक्रम केला. केशव शंखनाद पथकाच्या वतीने याचे कर्वेनगर मधील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत हा विश्वविक्रम साकारला गेला.**



> स्त्रियांना यापूर्वी संघर्ष होता. त्यांना सन्मान मिळावा, यासाठी झटणारे अनेक महामानव आणि योगिनी होऊन गेल्या. महिलांनी सक्षम होण्यासाठी केवळ शिक्षित होणे महत्त्वाचे नाही तर सुशिक्षित होणे गरजेचे आहे. शंख वादन आणि महिला हा विषय पूर्वी नव्हता. आता शंखवादन पथकाच्या माध्यमातून आजच्या आणि पुढच्या पिढीला हे पाहायला मिळणार आहे.
>
> - मंजूषा नागपुरे, **महापौर, पुणे**

महापौर मंजूषा नागपुरे, निवृत्त अतिरिक्त पोलीस अधीक्षक रेखा साळुंखे, 'सोल्जर्स इंडिपेंडंट रिहॅबिलिटेशन फाउंडेशन' (सिर्फ) च्या संस्थापिका सुमेधा चिथडे, निवृत्त मुख्याध्यापक उमा जोशी, क्रीडापटू प्रीती म्हस्के, वर्ल्ड रेकॉर्ड इंडियाच्या सुषमा नार्वेकर तसेच पथकाचे संस्थापक नितीन महाजन यांसह अनेक मान्यवर या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थित होते. कार्यक्रमाच्या वेळी महापौर मंजूषा नागपुरे आणि सुषमा नार्वेकर यांच्या हस्ते पथकातील बाल महिला वादकाला पदक परिधान करून शंखवादनाच्या या उल्लेखनीय उपक्रमाचा विश्वविक्रम झाल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. या घोषणेनंतर उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात आणि उत्साहपूर्ण वातावरणात या ऐतिहासिक क्षणाचे स्वागत केले.

कार्यक्रमाची सुरुवात ओंकाराच्या मंगल ध्वनीने करण्यात आली आणि त्यानंतर शंखवादन विश्वविक्रमाच्या सादरीकरणाला प्रारंभ झाला. सुरुवातीला शंख मंत्राचे भक्तिभावाने पठण करण्यात आले. त्यानंतर शंखवादनाच्या माध्यमातून विविध रचनांची प्रभावी मांडणी करण्यात आली. यामध्ये ब्रह्मनाद, सात खंड, अर्धवलय, तुतारी, पूर्णवलय, सुदर्शन चक्र आणि मुक्तछंद अशी सात वेगवेगळी आवर्तने सादर करण्यात आली. या प्रत्येक सादरीकरणातून शंखवादनाची परंपरा, त्यातील लयबद्धता आणि आध्यात्मिकतेची अनुभूती उपस्थितांना मिळाली.

यानंतर गजानना, श्री दत्त आणि श्री राम जयराम हे तीन मंत्रघोष शंखावर अत्यंत सुरेल आणि प्रभावी पद्धतीने सादर करण्यात आले. या मंत्रघोषांनी संपूर्ण परिसर भक्तिमय आणि ऊर्जायुक्त वातावरणाने भारून गेला. पुढे शंख, डमरू आणि संबळ यांची सादर झालेली जुगलबंदी हा कार्यक्रमातील विशेष आकर्षणाचा भाग ठरला. या जुगलबंदीने उपस्थितांना वेगळीच ऊर्जा आणि सांस्कृतिक अनुभव दिला.या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पथकाने विशेष महिला समितीची स्थापना केली होती.

# आळंदीतील आध्यात्मिक शिक्षण संस्थेवर बंदी

## मुलीवरील अत्याचार प्रकरणानंतर कारवाई; बालकांना शासकीय बालगृहात हलवले

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आळंदी येथील जाहुरकर महाराज आध्यात्मिक शिक्षण संस्थेवर बंदीची कारवाई करण्यात आली आहे. या संस्थेतील 47 बालकांचे शासकीय बालगृहात पुनर्वसन केल्याची माहिती मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी दिली. या संस्थेत आध्यात्मिक शिक्षण घेणाऱ्या 12 वर्षीय मुलीवर शारीरिक व मानसिक शोषण झाल्याचे उघडकीस आले आहे. याबाबत गुन्हा देखील दाखल झाला आहे.**



यावर तातडीने दखल घेत या संस्थेवर बंदीची कारवाई केली. संस्थेतील 43 मुले व 4 मुलींना तीन शासकीय बालगृहांमध्ये सुरक्षितपणे हलविण्यात आले आहे. मु या कारवाईत मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्या समवेत आळंदीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक भीमा नरके, नगरपरिषद कर व प्रशासकीय सेवा विभाग सीमा चारभे, लेखापरीक्षक प्रदीप आवारी, सहायक प्रकल्प अधिकारी वैशाली पाटील, अभियंता मिथिल पाटील, कर्मचारी नाना घुंडरे, आळंदी पोलिस दामिणी पथकाच्या पूजा नाईक, श्वेता शेलकर, समुदाय संघटक अर्जुन घोडे, बाल संरक्षण अधिकारी शत्रुघ्न खोकले, पोलिस कर्मचारी मच्छिंद्र शेंडे उपस्थित होते. ख्याधिकारी खांडेकर यांच्या नेतृत्वात शनिवारी (दि. 7) सकाळी 11 वाजता नगरपरिषद अधिकारी, आळंदी दामिणी महिला पोलिस पथक आणि जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे अधिकारी यांनी संस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीत त्यांना अनेक गंभीर त्रुटी निदर्शनास आल्या.

महिला व बालविकास विभागाच्या 3 जुलै 2025 च्या शासन निर्णयानुसार अनधिकृत व नियमभंग करणाऱ्या संस्थांवर कारवाई करण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. त्या अधिकाराचा वापर करत संस्था तत्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले.

भोजनाचा निश्चित मेनू नव्हता आणि विद्यार्थ्यांनी दिलेल्या माहितीनुसार रात्रीचे उरलेले अन्न सकाळी दिले जात होते. याशिवाय गेट रजिस्टर, प्रथमोपचार पेटी, तक्रार पेटी आणि नियम-अटींचे फलकही संस्थेत नव्हते.

### मुलांना निवासी ठेवण्याचा परवानाच नाही

संस्थेत विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज व आधार कार्ड नोंदी नव्हत्या. पालकांचे प्रवेश अर्ज व छाननी समिती अस्तित्वात नव्हती, नियमानुसार कर्मचारी वर्ग उपलब्ध नव्हता, अभ्यासिका व भोजन हॉल एकाच खोलीत होते. स्वयंपाकघर व निवासाची जागा अपुरी होती. पुरेशी व हवेशीर स्नानगृहे-स्वच्छतागृहे नव्हती.

तपासणीत सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे संस्थेकडे मुले व मुली निवासी ठेवण्याचा शासनाच्या कोणत्याही विभागाचा वैध परवाना नसल्याचे निष्पन्न झाले.

# पुणे आणि पिंपरी-चिंचवड मेट्रोमध्ये महिला व ज्येष्ठांसाठी राखीव

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**णे आणि पिंपरी-चिंचवड महाराष्ट्र मेट्रो कॉर्पोरेशन (महामेट्रो) च्या प्रवासात महिला आणि ज्येष्ठांसाठी राखीव जागा नसल्याने त्याची मोठी गैरसोय होत होती. या पार्श्वभूमीवर महिला आणि ज्येष्ठांकडून राखीव जागा ठेवण्याची मागणी करण्यात आली होती. ही मागणी लक्षात घेत मेट्रो व्यवस्थापनाने मेट्रोच्या तिन्ही डब्यांत महिला व ज्येष्ठांसाठी राखीव जागा ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. जागतिक महिला दिन 8 मार्चपासून हा निर्णय लागू करण्यात करण्यात येणार असल्याची माहिती पुणे मेट्रोकडून देण्यात आली आहे.**



PUNE METRO सध्या VANAZ ते RAMWADI आणि PIMPRI-CHINCHWAD ते SWARGATE या मार्गावर मेट्रो धावत आहे. पिंपरी, संत तुकाराम नगर, भोसरी (नाशिक फाटा), कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी, बोपोडी असे एकूण सहा थांबे आहेत. मेट्रोमधून सध्या दोन लाखांपेक्षा जास्त प्रवासी प्रवास करतात. यामध्ये महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची संख्या जास्त प्रमाणात आहे. त्यामुळेच पुणे मेट्रोच्या प्रत्येक ट्रेनमधील तिन्ही डब्यांमध्ये महिला आणि ज्येष्ठांसाठी विशेष आसन व्यवस्था करण्यात आली आहे. या संदर्भात दैनिक पुढारीमध्ये वृत्त प्रसिद्ध करण्यात आले होते. या वृत्ताची महामेट्रो व्यवस्थापकांनी दखल घेत ज्येष्ठ आणि महिलांसाठी राखीव आसन करण्याचा निर्णय घेतला आहे.

मेट्रो सेवा सुरू झाल्यानंतर शहरातील नागरिकांकडून या वाहतूक व्यवस्थेला मोठा प्रतिसाद मिळत आहे. वेगवान, सुरक्षित आणि वेळेची बचत करणारा प्रवास मिळत असल्यामुळे अनेक नागरिकांनी खासगी वाहनांऐवजी मेट्रोचा पर्याय स्वीकारण्यास सुरुवात केली आहे. यामुळे मेट्रो स्थानकांवर तसेच गाड्यांमध्ये प्रवाशांची संख्या सातत्याने वाढताना दिसत आहे.

मेट्रोचा प्रवास वेगवान व सुलभ असल्यामुळे मेट्रोच्या वाढलेल्या गर्दीमधून प्रवाशांना दाटीवाटीने प्रवास करावा लागत होता. मात्र आता गर्दीच्या वेळीही महिला तसेच ज्येष्ठ प्रवाशांची गैरसुविधा होणार नाही. त्यांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सोयीस्कर होण्यास मदत होणार आहे. आसनव्यवस्थेची सविस्तर माहिती पुणे मेट्रोच्या सर्व स्थानकांवर तसेच अधिकृत मोबाईल ॲपवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मेट्रोच्या डब्यांमध्ये चिन्हांद्वारे राखीव जागा स्पष्टपणे दर्शविण्यात येणार असल्यामुळे प्रवाशांना त्या सहज ओळखता येणार आहेत. या राखीव जागांच्या नियमांचे पालन करून महिला व ज्येष्ठ नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन महामेट्रो प्रशासनाकडून करण्यात आले.

### प्रत्येक ट्रेनमध्ये 54 जागा राखीव

पुणे मेट्रोच्या नियोजनानुसार, प्रत्येक ट्रेनमध्ये महिलांसाठी 46 जागा आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी 8 जागा राखीव ठेवण्यात येणार आहेत.

कोचनुसार राखीव जागा :

पहिला कोच (डीएमए कार ) महिलासाठी 14, ज्येष्ठ नागरिक -2

मधला कोच - (टी- कार ) महिलांसाठी 18, ज्येष्ठ नागरिक 4

तिसरा कोच- (डीएमबी कार ) महिलांसाठी 14 ज्येष्ठ नागरिक 2



## भूमिका

# विनाशाच्या उंबरठ्यावर जग...

**अमेरिका आणि ISRAEL यांनी IRAN विरोधात पुन्हा युद्धजन्य कारवाई सुरू केल्यानंतर नेमके काय साध्य झाले, हा प्रश्न आता स्वतः त्या देशांसमोर उभा राहू लागला आहे. युद्ध सुरू होऊन काही दिवस उलटताच परिस्थिती अपेक्षेपेक्षा अधिक गुंतागुंतीची इराणचे सर्वोच्च नेते ALI KHAMENEI यांना लक्ष्य केल्यास इराण लगेच शरण येईल, बनली आहे.**



असा अंदाज व्यक्त केला जात होता; मात्र हा अंदाज पूर्णपणे चुकीचा ठरल्याचे दिसते. उलट प्रतिशोधाच्या भावनेने प्रेरित झालेल्या इराणने अमेरिकेच्या लष्करी तळांवर आणि दूतावासांवर तीव्र हल्ले करून संघर्ष अधिक चिघळवला आहे.

हा संघर्ष पूर्वीच्या IRAQ किंवा AFGHANISTAN मधील युद्धांसारखा केवळ पारंपरिक लष्करी मोहिमांपुरता मर्यादित राहील असे दिसत नाही. इराणची प्रगत प्रतिकार क्षमता, त्यांचे प्रॉक्सी गट आणि बहुआयामी रणनीती यामुळे हा संघर्ष अधिक व्यापक आणि धोकादायक रूप धारण करू शकतो. परिणामी मध्यपूर्वेत तणाव वाढण्याबरोबरच जागतिक अर्थव्यवस्थेलाही मोठा धक्का बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

युद्धामुळे जागतिक ऊर्जा बाजारात मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे. कच्च्या तेलाचा पुरवठा विस्कळीत होऊ लागल्याने पेट्रोल, डिझेल आणि स्वयंपाक गॅसच्या दरांमध्ये वाढ होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. कच्च्या तेलाच्या किंमती प्रति बॅरल सुमारे ८७ डॉलरपर्यंत पोहोचल्याचे सांगितले जात आहे. त्याचा परिणाम वीजदरांपासून वाहतूक, अन्नधान्य, औषधे आणि इतर आवश्यक वस्तूंवर होऊ शकतो. त्यामुळे जगभर महागाईचा दबाव वाढण्याची शक्यता आहे आणि INDIA सारख्या आयातावर अवलंबून असलेल्या देशांनाही त्याचा फटका बसू शकतो.

संघर्ष आणखी वाढल्यास तो LEBANON आणि YEMEN सारख्या देशांपर्यंत पसरू शकतो. इराणशी संबंधित गट सक्रिय झाल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते. विशेषतः STRAIT OF HORMUZ या महत्त्वाच्या सामुद्रधुनीत अडथळे निर्माण झाल्यास जगातील सुमारे २० टक्के तेल व्यापारावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या संघर्षात इराणने अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचा वापर केल्याचेही सांगितले जाते. विशेषतः अतिजलद गतीने लक्ष्य गाठणाऱ्या हायपरसॉनिक प्रणालींमुळे अमेरिकेसह इस्रायलच्या संरक्षण व्यवस्थांनाही आव्हान निर्माण झाले आहे. यापूर्वी TEHRAN आणि TEL AVIV दरम्यान झालेल्या संघर्षानंतर प्रादेशिक तणाव अधिक तीव्र झाला आहे.

दरम्यान RUSSIA आणि CHINA यांची भूमिका देखील या संघर्षाला अधिक गुंतागुंतीची बनवू शकते. जागतिक राजकारणातील बहुध्रुवीय समीकरणे लक्षात घेतली तर हा संघर्ष केवळ दोन देशांपुरता मर्यादित राहणार नाही, तर त्याचे परिणाम जगभर जाणवू शकतात.

जागतिक अर्थव्यवस्था आधीच महागाई आणि पुरवठा साखळीतील अडचणींशी झुंज देत असताना हा संघर्ष आणखी संकट निर्माण करू शकतो. ऊर्जा-आधारित उद्योग, विमानवाहतूक, जहाजवाहतूक आणि उत्पादन क्षेत्रांवर त्याचा तातडीचा परिणाम होऊ लागला आहे. त्यामुळे हा संघर्ष केवळ मध्यपूर्वेपुरता मर्यादित न राहता जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा व्यवस्था आणि अन्न-इंधन पुरवठा साखळीला हादरा देणारा ठरत आहे.

काही आंतरराष्ट्रीय विश्लेषकांच्या मते, अंतर्गत राजकीय दबावांमुळे काही देशांनी हा संघर्ष तीव्र केला असावा. मात्र परिस्थिती ज्या दिशेने जात आहे, ती पाहता एकच म्हण लागू होते— "विनाशकाळी विपरीत बुद्धी."

## प्रासंगिक »

### अरण्य व लाकूडतोड्या

***एकदा एक लाकूडतोड्या रानात गेला असता इकडे तिकडे पाहात रडू लागला. तेव्हा रानातल्या झाडांनी त्याला विचारले, 'तू का रडतोस ? तुला काय हवं आहे ?' तो म्हणाला,***

'माझ्या कुऱ्हाडीला दांडा नाही, त्यासाठी लाकडाचा एक लहानसा तुकडा मला द्याल तर बरं होईल.' ते ऐकून झाडांना त्याची दया आली व त्याला चिंचेच्या चिवट लाकडाचा एक तुकडा दिला. लाकूडतोड्याने तो आपल्या कुऱ्हाडीला घातला व सगळी झाडे तोडण्याचा सपाटा लावला. तेव्हा एक झाड इतर झाडांना म्हणाले, 'मित्रहो, आपण आपल्याच हाताने आपला नाश करून घेतला आहे. तेथे दुसऱ्याला नावं ठेवायला जागा नाही.'

तात्पर्य :

शत्रूची कीव करून त्याला साहित्य पुरविले तर शेवटी पश्चात्ताप करण्याची वेळ येते. शत्रूवरही उपकार करण्यात, त्याच्या चुकांबद्दल क्षमा करण्यात मोठेपणा आहे हे जरी खरे असले तरी ज्यामुळे आपला शत्रू बलवान होऊन आपल्यालाच उपद्रव देऊ शकेल. अशा प्रकारचे साह्य त्याला देणे हा मूर्ख-पणा होय.

United States-Israel-Iran संघर्षाचा आठवा दिवसही भीती आणि अनिश्चिततेच्या वातावरणात गेला. इस्रायलने इराणच्या भूमीत स्फोट घडवून आणण्याचे हल्ले सुरूच ठेवले असताना इराणने मात्र शेजारी देशांविषयी तुलनेने संयमाची भूमिका घेतली आहे.

# युद्धाचा आठवा दिवस : तणाव, इराणचे पाऊल

इराणचे अध्यक्ष Masoud Pezeshkian यांनी स्पष्ट केले की, शेजारी देश त्यांच्या भूमीवरून इराणवर हल्ले करत नसतील तर इराणकडूनही त्यांच्यावर पुढे हल्ले केले जाणार नाहीत. अलीकडे शेजारी देशांवर झालेल्या हल्ल्यांबद्दल त्यांनी दिलगिरीही व्यक्त केली.

२८ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या युद्धात इराणने इस्रायलसह मध्यपूर्वेतील तब्बल १३ देशांना लक्ष्य केले होते. कुवेत, बहरीन आणि United Arab Emirates येथील सुमारे २० अमेरिकन लष्करी तळांवर हल्ले करण्यात आल्याची माहिती समोर आली. मात्र आठवड्याभरानंतर इराणने शेजारी देशांबरोबर तणाव वाढवण्याची इच्छा नसल्याचे सांगितले. तरीही परिस्थिती पूर्णपणे शांत झालेली नाही. काही वेळानंतरच Doha या कतारच्या राजधानीत स्फोट झाल्याची माहिती समोर आली.

दरम्यान अमेरिकेने इराणवर मोठ्या कारवाईचे संकेत दिले आहेत. अमेरिकेचे



ट्रेझरी सचिव Scott Bessent यांनी इराणवर आजपर्यंतचा सर्वात मोठा हल्ला होण्याची शक्यता व्यक्त केली. या कारवाईचा मुख्य उद्देश इराणच्या क्षेपणास्त्र लाँचर आणि क्षेपणास्त्र निर्मिती कारखान्यांना लक्ष्य करणे असल्याचे त्यांनी सांगितले.

या युद्धाच्या पार्श्वभूमीवर एक वेगळी घडामोड भारतातही घडली आहे. इराणची IRIS Lavan ही युद्धनौका तांत्रिक बिघाडामुळे Kochi बंदरात थांबविण्यात आली आहे. २८ फेब्रुवारीला बिघाड झाल्यानंतर इराणने भारताची मदत मागितली आणि भारताने जहाजाला बंदरात प्रवेशाची परवानगी दिली. या जहाजावरील १८३ खलाशी सध्या भारतीय नौदलाच्या सुविधांमध्ये राहात आहेत. यापूर्वी ही युद्धनौका भारतात झालेल्या आंतरराष्ट्रीय नौदल कार्यक्रमांमध्ये सहभागी झाली होती. याचदरम्यान, श्रीलंकेजवळ अमेरिकेने इराणच्या IRIS Dena या युद्धनौकेवर हल्ला करून ती बुडविल्याची घटना घडली होती, ज्यामध्ये ८७ खलाशी ठार झाल्याचे वृत्त आहे.

इराणच्या मदत संस्थेने दिलेल्या माहितीनुसार युद्धाच्या सुरुवातीपासून अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर नागरी भागांना लक्ष्य करण्यात आले आहे. या हल्ल्यांमध्ये हजारो नागरी ठिकाणांचे नुकसान झाले असून ५,५०० हून अधिक घरे, हजाराहून अधिक दुकाने, अनेक शाळा आणि वैद्यकीय केंद्रे उद्ध्वस्त झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

दरम्यान इराणने Jordan मधील मुवफ्फक सल्ती हवाई तळावर असलेली अमेरिकेची प्रगत क्षेपणास्त्र संरक्षण रडार प्रणाली नष्ट केल्याचे वृत्त आहे.

## ।। अभंगवाणी ।।



समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ।
तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥१॥

आणीक न लगे मायिक पदार्थ ।
तेथें माझें आर्त नको देवा ॥ध्रु.॥

\- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# 'मनसे' सदस्य नोंदणीचा प्रारंभ थेट रायगडावरून

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरेंनी पक्षाच्या सदस्य नोंदणीबद्दल केली महत्त्वाची घोषणा





**महाईन्यूज | मुंबई**

**महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाचा २० वा वर्धापनदिन ९ मार्च २०२६ रोजी साजरा होत असून, या निमित्ताने पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी महाराष्ट्र सैनिकांना विशेष संदेश दिला आहे. या संदेशात त्यांनी १० मार्चपासून पक्षाची सदस्य नोंदणी मोहीम सुरू होत असल्याची घोषणा केली आहे.**

राज ठाकरे यांनी फेसबुक पोस्टद्वारे सांगितले की, ९ मार्च रोजी ते रायगड किल्ला येथे जाऊन छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करतील आणि त्यानंतर सदस्य नोंदणी मोहिमेची सुरुवात करतील. रायगड हा शिवाजी महाराजांच्या वास्तव्याचा तसेच शिवराज्याभिषेक सोहळ्याचा साक्षीदार असल्याने अशा पवित्र स्थळावरून मोहिमेला प्रारंभ करण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज ठाकरे यांनी महाराष्ट्र सैनिकांना आवाहन करताना स्पष्ट केले की, ही सदस्य नोंदणी केवळ पक्ष कार्यकर्त्यांपुरती मर्यादित नसून महाराष्ट्राला आकार द्यायची इच्छा असलेल्या प्रत्येक व्यक्तीला या चळवळीत सहभागी करून घ्यावे. सध्याच्या परिस्थितीबद्दल नाराजी असलेल्या नागरिकांनाही नवनिर्माणाच्या ध्यासाशी जोडण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी सदस्य नोंदणी डिजिटल स्वरूपातही केली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. केवळ पक्ष शाखांबाहेर स्टॉल्स लावण्यापुरते मर्यादित न राहता बाजारपेठा, शाळा, मंदिरे, कॉलेज, मैदानं आणि बागा यांसारख्या गर्दीच्या ठिकाणी सदस्य नोंदणी केंद्रे उभारण्याचे निर्देश त्यांनी कार्यकर्त्यांना दिले आहेत. येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांशी संवाद साधून त्यांना पक्षाशी जोडण्याचेही त्यांनी सांगितले.

### पाडवा मेळाव्याला संबोधित करणार

या मोहिमेत आकड्यांपेक्षा मराठी माणसाच्या भावना आणि महाराष्ट्रासाठी काम करण्याची तयारी महत्त्वाची असल्याचे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले. राज्यातील सध्याच्या परिस्थितीबद्दल लोकांच्या मनात किती नाराजी आहे, हेही या मोहिमेतून स्पष्ट होईल, असे त्यांनी म्हटले. दरम्यान, १९ मार्च रोजी शिवतीर्थ (शिवाजी पार्क) येथे गुढी पाडवा निमित्ताने कार्यकर्त्यांशी भेट होणार असल्याचेही राज ठाकरे यांनी सांगितले.

# महिला दिनी ९ हजार १११ विद्यार्थिनींनी रचला इतिहास

**महाईन्यूज | मुंबई**

**जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कल्याण-डोंबिवलीच्या शहर आणि ग्रामीण भागातील ९ हजार १११ महिलांसह विद्यार्थीनींनी एकत्र येऊन सामूहिक लेझीम वादन केले. वर्ल्ड रेकॉर्ड करणाऱ्या नारी शक्तीने डोंबिवलीच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला आहे.**





डोंबिवलीचे आमदार तथा भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या डोंबिवलीकर... एक सांस्कृतिक परिवार आणि कल्याण तालुका शारीरिक शिक्षण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सामूहिक लेझीम वादन उपक्रम आयोजित करण्यात आला होता. रविवारी (दि.८) हभप सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुलातील विस्तीर्ण पटांगणावर तालुक्यातील शेकडो शाळांच्या विद्यार्थीनी आणि महिलांनी एकत्र येत ९ हजार १११ इतक्या मोठ्या संख्येने सामूहिकपणे लेझीम वादनाचा वर्ल्ड रेकॉर्ड केला.

यापूर्वी सांगलीकरांच्या नावाने हा रेकॉर्ड होता, अशी माहिती गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे लंडनहून आलेले अधिकारी स्वप्नील डांगरेकर यांनी उपस्थितांशी संवाद साधताना दिली. या आधी सांगलीमध्ये ७ हजार ३३८ महिलांनी एकत्र येऊन रेकॉर्ड केला होता. मात्र हा रेकॉर्ड रविवारी डोंबिवलीत मोडण्यात आल्याचे डांगरेकर यांनी जाहीर केले. साडेपाच मिनिटांची विविध प्रात्यक्षिक सादर करून महिलांनी हा रेकॉर्ड केला.

यावेळी डांगरेकर यांनी आमदार रविंद्र चव्हाण यांच्या सुविद्य पत्नी सुहासी चव्हाण यांच्याकडे वर्ल्ड रेकॉर्ड झाल्याचे प्रमाणपत्र आणि पदक हस्तांतरीत करण्यात आले. वर्ल्ड रेकॉर्ड करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या कल्याण तालुका शारीरिक शिक्षण समितीचे आमदार रविंद्र चव्हाण यांनी आभार मानत उपस्थित शिक्षक आणि विद्यार्थीनींना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळीं सारा परिसर भारत माता की जय...जय श्रीराम...वंदे मातरम्...ने दणाणून सोडला होता.

### वर्ल्ड रेकॉर्ड भारत मातेच्या चरणी अर्पण - रविंद्र चव्हाण

लेझीम ही आपली संस्कृती असून ती टिकवणे हे आपले काम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यंदाच्या वर्षी शारीरिक व्यायामावर भर देऊन जगासमोर सशक्त भारत कसा असू शकतो हे दाखवून देण्याचा संकल्प सोडला होता, त्या निमित्ताने महिला, विद्यार्थीनी आदींनी एकत्र येऊन हा अनोखा रेकॉर्ड केला याचा मला डोंबिवलीकर म्हणून प्रचंड आनंद आहे, हा रेकॉर्ड मी भारत मातेच्या चरणी समर्पित करतो असे उद्गार काढत आमदार रविंद्र चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### विश्वविक्रमाच्या नोंदीचा साक्षीदार होण्यासाठी...

प्रत्येक जणीच्या चेहऱ्यावर वर्ल्ड रेकॉर्ड केल्याचा आनंद ओसंडून वहात होता. लेझीमचा झंकार सर्वत्र निनादत होता. ढोल-ताशांच्या गजरात त्या रेकॉर्डचे उपस्थित हजारो डोंबिवलीकरांनी टाळ्यांच्या कडकडाटात जंगी स्वागत केले. प्रत्येकाच्या सहभागाबद्दल आयोजकांकडून कौतुक करण्यात आले. डोळ्यांचे पारणे फेडणारा नजारा पाहण्यासह अशा दैदिप्यमान सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी डोंबिवलीकर पहाटेपासून प्रतीक्षेत होता. अखेर गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे अधिकारी स्वप्नील डांगरेकर यांनी वर्ल्ड रेकॉर्डची घोषणा करताच उपस्थित साऱ्यांनी प्रचंड जल्लोषात आनंद व्यक्त केला.

# अमेरिकन नौदलाच्या ताफ्यावर बॉम्बहल्ला

## ट्रम्प यांच्या धमकीनंतर इराण आक्रमक; 21 सैनिकांचा मृत्यू

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**इराण-अमेरिका इस्रायल यांच्यातील युद्ध थांबण्याची कुठलीही चिन्हे दिसत नाहीत, उलट ते अधिक तीव्र झाले आहे. इराणी सशस्त्र दलांनी दावा केला आहे की त्यांनी बहरीनमध्ये असलेल्या अमेरिकेच्या पाचव्या नौसेना तुकडीवर हल्ला केला आहे. इराणच्या दाव्यानुसार या हल्ल्यामध्ये त्यांच्या 21 सैनिकांचा मृत्यू झाला आहे आणि अनेक इतर जखमी झाले आहेत.**





अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सर्वात मोठा हल्ला करण्याची धमकी दिली होती. तसेच इराण म्हणजे पश्चिम आशियातील हरलेला देश असून त्यांचा सगळा माज उतरला आहे असेही म्हटले होते. तसेच उत्तराधिकारी ठरवणार, लष्करी नियंत्रण आणि तेलाचे नियंत्रण अशी इराणच्या भविष्यासंबंधी तीन आश्वासनांची स्वत:घोषणा करत इराणी



सरकारला इशारा दिला होता. त्यानंतर इराणकडून अमेरिकेच्या नौदलाच्या ताफ्यावर बॉम्ब हल्ला करण्यात आला आहे. इराणने बहरीनच्या राजधानी मनामामधील जुफैर विभागात अमेरिकेच्या नौदलाच्या फ्लीट मुख्यालयावर हल्ला केला आहे. इराणी मीडियाने एक व्हिडिओ जारी केला आहे, ज्यामध्ये हल्ल्यानंतर आग लागलेली दिसत आहे. अमेरिकेच्या नौसेनाचा हा पाचवा नेव्हल सपोर्ट ॲक्टिविटी बहरीनमध्ये स्थित आहे आणि मध्य-पूर्वेत अमेरिकेची महत्त्वाची लष्करी उपस्थिती मानली जाते.

### ऑपरेशन एपिक फ्यूरी अन् इराण

28 फेब्रुवारीला इस्रायल आणि अमेरिकेने हल्ला केल्यानंतर इराणने बॅलेस्टिक मिसाईल आणि शाहेद -136 ड्रोनने येथे हल्ला केला होता. इराणने या हल्ल्यांना अमेरिका आणि इस्रायलच्या संयुक्त अभियान 'ऑपरेशन एपिक फ्यूरी'चे उत्तर म्हणून घोषित केले आहे. इराणचा दावा आहे की या ऑपरेशनमध्ये त्यांच्या अनेक वरिष्ठ नेत्यांना लक्ष्य बनवले गेले होते. हल्ल्याच्या आधी अमेरिका क्षेत्रात आपल्या नौदलची तैनाती वाढवली होती. रिपोर्टनुसार, तैनात केलेल्या अमेरिकन नौसेना ताफ्यापैकी सुमारे एक-तृतीयांश हिस्सा इराणला थांबविण्यासाठी या भागात ठेवण्यात आला होता. 1 मार्च रोजी सर्वोच्च नेते खामेनी यांच्या मृत्यूचे वृत्त समोर आले होते. त्यावेळी इराण नरमाईची भूमिका घेईल असे अमेरिकेला वाटले पण इराणकडून जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले आहे. इराणच्या राष्ट्राध्यक्षांनीही नमती भूमिका घेणार नाही अशा स्वरुपाचा इशारा ट्रम्प यांना दिला आहे.

# राष्ट्रपतींचा अपमान म्हणजे संविधानाचा अपमान; पंतप्रधान नरेंद्र मोदी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या कार्यक्रमात प्रोटोकॉलचे उल्लंघन झाल्याच्या मुद्द्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगालमधील तृणमूल कॉंग्रेस (TMC) सरकारवर जोरदार टीका केली. ही घटना केवळ राष्ट्रपतींचा अपमान नसून, भारताच्या संविधान आणि लोकशाहीच्या भावनेवर आघात असल्याचे त्यांनी म्हटले.**





आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त रविवारी दिल्लीमध्ये आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान मोदी सुमारे 33,500 कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करत होते. यावेळी आयोजित जनसभेला संबोधित करताना त्यांनी पश्चिम बंगाल सरकारवर निशाणा साधला. पंतप्रधान मोदी म्हणाले, आज देश आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करत आहे, पण काल पश्चिम बंगालमध्ये टीएमसी सरकारने देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा घोर अपमान केला. त्या संथाल समाजाच्या मोठ्या उत्सवात सहभागी होण्यासाठी बंगालमध्ये गेल्या होत्या. मात्र त्यांचा सन्मान करण्याऐवजी टीएमसीने या पवित्र कार्यक्रमाचा बहिष्कार केला. मोदी पुढे म्हणाले की, द्रौपदी मुर्मू स्वतः आदिवासी समाजातून आलेल्या आहेत आणि त्या नेहमीच आदिवासी समाजाच्या विकासासाठी प्रयत्नशील असतात. तरीही राज्य सरकारने या कार्यक्रमाचे व्यवस्थापन योग्य प्रकारे केले नाही. हे केवळ राष्ट्रपतींचा अपमान नाही, तर भारताच्या संविधानाचा आणि लोकशाहीच्या महान परंपरेचाही अपमान आहे. पंतप्रधान मोदी यांनी टीएमसी सरकारवर टीका करताना म्हटले की, सत्तेचा अहंकार कोणाचाही टिकत नाही. टीएमसीचे गलिच्छ राजकारण आणि सत्तेचा अहंकार, ज्यामुळे एका आदिवासी महिला राष्ट्रपतींचा अपमान झाला, तो बंगालची जनता लवकरच चकनाचूर करेल. पश्चिम बंगालमधील जागरूक जनता, देशातील महिला आणि आदिवासी समाज टीएमसीला हा अपमान कधीही माफ करणार नाही, असेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भाजपचे आरोप फेटाळून लावले आहेत. त्यांनी सांगितले की, संबंधित कार्यक्रमाबाबत राज्य सरकारला कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नव्हती.

### नेमका वाद काय?

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या उत्तर बंगाल दौऱ्यावर असताना दार्जिलिंग जिल्ह्यातील 9व्या आंतरराष्ट्रीय संथाल परिषदेत मुख्य अतिथी म्हणून सहभागी झाल्या होत्या. सुरुवातीला हा कार्यक्रम फांसीदेवा ब्लॉकमधील बिधाननगर येथे होणार होता, जिथे मोठ्या प्रमाणावर संथाल आदिवासी समाजातील लोक उपस्थित राहू शकले असते. मात्र राज्य प्रशासनाने सुरक्षा, गर्दी आणि इतर कारणे सांगत कार्यक्रमाचे ठिकाण बागडोगरा विमानतळाजवळील गोसाईंपूर येथे हलवले. राष्ट्रपतींनी या बदलाबाबत नाराजी व्यक्त करत नवीन ठिकाण लहान असल्याने अनेकांना कार्यक्रमात सहभागी होता आले नसल्याचे सांगितले.

# मी गोरी दिसावी म्हणून मेकअप लावला

बॉलिवूडमध्ये एकेकाळी आपल्या अभिनयाने आणि सौंदर्याने प्रेक्षकांना भुरळ घालणारी अभिनेत्री समीरा रेड्डी सध्या तिच्या रोखठोक विधानांमुळे चर्चेत आली आहे. रुपेरी पडद्यावर ग्लॅमरस दिसणाऱ्या अभिनेत्रींना पडद्यामागे कोणत्या गोष्टींना सामोरं जावं लागतं, याबद्दल समीराने धक्कादायक खुलासा केला आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत समीराने बॉलिवूडमधील सौंदर्याची व्याख्या नेमकी काय, यावर बोट ठेवलं आहे. मिड डेला दिलेल्या मुलाखतीत समीरा रेड्डी म्हणाली, अभिनेत्रींना पडद्यावर सुंदर दिसण्यासाठी प्रचंड मानसिक दबाव टाकला जात असे. ती म्हणाली, "मी गोरी नाहीये त्यामुळे मला गोरं व्हावं लागेल असं अभिनेत्री म्हणून मला सुरुवातीला वाटायचं. त्यामुळे अनेक विचित्र कारणांनी मी गोरी दिसावी म्हणून माझ्यावर मेकअप लावला जायचा. मला स्वतःला आरशात पाहतानाही भीती वाटायची, कारण मी जी दिसत होती ती नैसर्गिक नव्हती. केवळ प्रेक्षकांना आवडेल अशा सौंदर्याची व्याख्या पूर्ण करण्यासाठी हे सर्व करावं लागायचं," अशा शब्दांत तिने आपल्या मनातील खंत व्यक्त केली. मेकअपशिवाय समीराला तिच्या वजनावरून आणि शरीरावरूनही अनेकदा टोमणे ऐकावे लागले होते. या सर्व गोष्टींमुळे तिच्या आत्मविश्वासावर वाईट परिणाम झाला होता. मात्र, चित्रपटसृष्टीपासून दूर गेल्यानंतर आता समीरा 'बॉडी पॉझिटिव्हिटी'चा प्रसार करत आहे. ती सोशल मीडियावर तिचे नैसर्गिक फोटो शेअर करत असते. यात तिचं वजन वाढलेलं दिसत असलं किंवा केस पांढरे झाले असले तरीही समीरा ते लपवत नाही. समीरा म्हणाली की, आजच्या अभिनेत्रींनी आणि तरुणींनी सौंदर्याच्या या कृत्रिम व्याख्येला बळी पडू नये.



# 'देसी गर्ल' ऑस्करमध्ये

आंतरराष्ट्रीय सिनेसृष्टीतील बहुमानाचा सोहळा मानल्या जाणाऱ्या 'ऑस्कर २०२६' (98TH ACADEMY AWARDS) मध्ये पुन्हा एकदा भारतीय ठसा उमटला जाणार आहे. बॉलिवूडची 'देसी गर्ल' आणि ग्लोबल आयकॉन प्रियंका चोप्राची या मानाच्या सोहळ्यात 'प्रेझेंटर' (पुरस्कार प्रदान करणारी) म्हणून निवड करण्यात आली आहे. या बातमीमुळे जगभरातील भारतीयांची मान अभिमानाने उंचावली आहे. अकादमीने यावर्षीच्या प्रेझेंटर्सची अधिकृत यादी जाहीर केली आहे. यामध्ये प्रियंका चोप्रासोबत 'आयर्न मॅन' फेम रॉबर्ट डाउनी ज्युनियर (ROBERT DOWNEY JR.) आणि ऑस्कर विजेती अभिनेत्री ॲन हॅथवे (ANNE HATHAWAY) यांसारख्या दिग्गज हॉलिवूड स्टार्सची नावे समाविष्ट आहेत. इतक्या मोठ्या जागतिक व्यासपीठावर प्रियंकाचे असणे, यावरुन हॉलिवूडमध्ये तिची किती लोकप्रियता आहे, हे दिसून येतं. प्रियंका चोप्राने यापूर्वी २०१६ मध्येही ऑस्कर सोहळ्यात पुरस्कार प्रदान केला होता. त्यानंतर आता दुसऱ्यांदा तिला हा बहुमान मिळत आहे. प्रियंका केवळ एक अभिनेत्री म्हणून नाही, तर एक निर्माती आणि आंतरराष्ट्रीय सेलिब्रिटी म्हणूनही जगभरात लोकप्रिय आहे.



# अंकिता लोखंडेचा पती रुग्णालयात



पवित्र रिश्ता फेम अभिनेत्री अंकिता लोखंडेचा पती आणि प्रसिद्ध व्यावसायिक विकी जैनवर गेल्या सहा महिन्यांत दुसऱ्यांदा शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. त्यानंतर त्याने चाहत्यांना त्याच्या प्रकृतीविषयीचे अपडेट्स दिली. सोशल मीडियावर त्याने एक पोस्ट शेअर केली असून त्यामध्ये त्याच्या हाताला पट्टी बांधलेली दिसत आहे. या पोस्टमध्ये विकीने सांगितलं की, ‘सर्जरी झाली आहे. आता ठीक होण्याची वेळ आहे आणि हे सुद्धा दाखवण्याची वेळ आली आहे की मी सतत अपघातांचा शिकार होणारा नाही.’ या फोटोच्या बॅकग्राउंडमध्ये रुग्णालयातली रुम पहायला मिळतेय. काही महिन्यांपूर्वीच विकीच्या हाताला मोठी दुखापत झाली होती आणि शस्त्रक्रियेदरम्यान त्याच्या हातावर तब्बल 45 टाके पडले होते. जवळपास आठवडाभर तो रुग्णालयात होता. विकीच्या या पोस्टवर कमेंट करत अनेकांनी त्याच्या आरोग्याविषयी काळजी व्यक्त केली आहे. या कठीण काळात अंकिता लोखंडे त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली. हॉस्पिटलमध्ये आणि घरी देखील ती पतीची पूर्ण काळजी घेत आहे. विकी जैन हा मूळचा बिलासपूरचा असून तो मोठा व्यावसायिक आहे. अंकिता लोखंडेशी लग्न केल्यानंतर तो मनोरंजन सृष्टीत प्रसिद्ध झाला. काही वर्षे एकमेकांना डेट केल्यानंतर 2021 मध्ये या दोघांनी धूमधडाक्यात लग्न केलं. अंकिता आणि विकीने ‘स्मार्ट जोडी’ आणि ‘बिग बॉस 17’ यांसारख्या शोजमध्ये भाग घेतला होता.

# नेहा पेंडसेने बीजांड गोठवले



नेहा पेंडसे नुकतीच ‘तिघी’ या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. या सिनेमात ज्येष्ठ अभिनेत्री भारती आचरेकर व सोनाली कुलकर्णीदेखील महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. ६ मार्चला प्रदर्शित झालेल्या या सिनेमाचे कौतुक होताना दिसत आहे. गश्मीर महाजनी, साजिरी जोशी अशा कलाकारांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत सिनेमाचे कौतुक केल्याचे पाहायला मिळाले. नेहा अभिनयाबरोबरच निर्माती म्हणूनही काम करते. नेहा गेल्या काही दिवसांपासून ‘तिघी’ सिनेमानिमित्त विविध मुलाखती देत आहे. काही दिवसांपूर्वीच तिने राजश्री मराठीला मुलाखत दिली होती. या मुलाखतीत तिने आई व्हायचे नाही, असे वक्तव्य केले होते.आता अभिनेत्रीने आरपार या यूट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत, बीजांड गोठवण्यामागे (EGGS FREEZING) काय विचार होता यावर तिने वक्तव्य केले. नेहा म्हणाली, “अगदी खरं सांगायचं तर खूप लहानपणापासून काम करत असल्यामुळे एक जबाबदारीची जाणीव नेहमीच होती. तसेच, त्यामुळे येणारा तणावही असायचा. लग्न करेपर्यंत मला मूल नकोय यावर मी ठाम होते, कारण मला स्वत:साठी जगण्याची संधी मिळालीच नव्हती, कारण मी सतत कामच करत होते. मला स्वत:चा वेळ (फ्री स्पेस) कधीच मिळाला नाही.

# क्रिकेट विश्वाचा नवा ‘फायनल बॉस’

## संजू सॅमसनने कोहली-सॅम्युअल्स-विल्यमसनचे रेकॉर्ड्स धुळीस मिळवले

**महाईन्यूज । अहमदाबाद**

**भारतीय फलंदाज संजू सॅमसनने टी-२० विश्वचषक २०२६ च्या महाअंतिम सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध ८९ धावांची झंझावाती खेळी साकारून विश्वविक्रमाला गवसणी घातली आहे. या खेळीसह संजू टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात जगातील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या उभारणारा फलंदाज ठरला आहे. त्याने भारताचा दिग्गज खेळाडू विराट कोहलीचा १२ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडीत काढला आहे.**




### टी-२० विश्वचषक फायनलमधील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या

- धावसंख्या - ८९ - संजू सॅमसन न्यूझीलंड विरुद्ध
- धावसंख्या - ८५* मार्लन सॅम्युअल्स इंग्लंड विरुद्ध
- धावसंख्या - ८५ केन विल्यमसन ऑस्ट्रेलिया विरुद्ध
- धावसंख्या - ७८ मार्लन सॅम्युअल्स श्रीलंका विरुद्ध
- धावसंख्या - ७७* मिचेल मार्श न्यूझीलंड विरुद्ध

### विराट कोहलीचा विक्रम इतिहासजमा

या ऐतिहासिक सामन्यात संजू सॅमसनने सुरुवातीला अवघ्या ३३ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले आणि त्यानंतर अतिशय संयत व आक्रमक फलंदाजीचे प्रदर्शन केले. संजू आपल्या शतकाच्या उंबरठ्यावर असताना ८९ धावांवर बाद झाला. मात्र, या धावांच्या जोरावर त्याने २०१४ च्या विश्वचषक फायनलमध्ये विराट कोहलीने श्रीलंकेविरुद्ध केलेल्या ७७ धावांच्या विक्रमाला मागे टाकले आहे. आता भारतासाठी विश्वचषक फायनलमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा मान संजू सॅमसनच्या नावे जमा झाला आहे.

### विक्रम मोडीत मार्लन सॅम्युअल्स आणि केन विल्यमसनलाही टाकले मागे

संजू सॅमसन केवळ भारताचाच नव्हे, तर जागतिक स्तरावर टी-२० विश्वचषक फायनलमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला आहे. त्याने वेस्ट इंडिजच्या मार्लन सॅम्युअल्सचा (८५* धावा, विरुद्ध इंग्लंड) आणि न्यूझीलंडच्या केन विल्यमसनचा (८५ धावा, विरुद्ध ऑस्ट्रेलिया) विक्रम मोडीत काढला आहे. संजू सॅमसनने आपल्या ४६ चेंडूंच्या या खेळीत ८ उत्तुंग षटकार आणि ५ चौकार मारले. १९३.४८ च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करत त्याने न्यूझीलंडच्या गोलंदाजांना पूर्णपणे निस्तेज केले. त्याच्या या ऐतिहासिक कामगिरीमुळे भारताने विजेतेपदाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे.

# भारतीय महिला क्रिकेट संघाचा कसोटी सामन्यात पराभव

**महाईन्यूज । दिल्ली**

**भारतीय पुरुषांचा संघ टी२० जेतेपदासाठीच्या लढतीसाठी सज्ज होत असताना, दूरवर ऑस्ट्रेलियात भारतीय महिला संघाला एकमेव कसोटीत पराभवाला सामोरं जावं लागलं आहे. पर्थ इथे झालेल्या कसोटीत तिसऱ्याच दिवशी भारतीय संघाने गाशा गुंडाळला. ऑस्ट्रेलियाची अनुभवी खेळाडू एलिसा हिलीचा हा शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना होता. सहकाऱ्यांनी दमदार विजय मिळवत हिलीला अनोखं अभिवादन केलं.**




ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. भरवशाची सलामीवीर स्मृती मानधना अवघ्या ४ धावा करून तंबूत परतली. आक्रमक फटकेबाजीसाठी ओळखली जाणारी शफाली वर्मा ३५ धावांची खेळी करुन तंबूत परतली. वर्ल्डकपदरम्यान दुखापतग्रस्त झालेल्या प्रतिका रावळने या सामन्याद्वारे कसोटी पदार्पण केलं. तिने १८ धावा केल्या. उत्तम फॉर्मात असलेल्या जेमिमा रॉड्रिग्जने ५२ धावांची खेळी केली. खेळपट्टीवर स्थिरावलेल्या जेमिमाला ल्युसी हॅमिल्टनने माघारी धाडलं. कर्णधार हरमनप्रीत कौरकडून भारतीय संघाला मोठ्या अपेक्षा होत्या मात्र ती १९ धावांवर बाद झाली. दिप्ती शर्मा आणि ऋचा घोष यांनाही मोठी खेळी करता आली नाही. पदार्पणवीर काशवी गौतमने ३४ धावा केल्या. भारतीय संघाचा डाव १९८ धावांतच आटोपला. अनाबेल सदरलँडने ४ तर ल्युसी हॅमिल्टनने ३ विकेट्स पटकावल्या.

ऑस्ट्रेलियाची सुरुवातही डळमळीत झाली. जॉर्जिआ वॉल आणि फोबी लिचफिल्ड झटपट तंबूत परतल्या. शेवटचा सामना खेळणारी अनुभवी एलिसा हिलीला पदार्पणवीर सायली सतघरेने माघारी परतावलं. एलिसा पेरीने ७६ धावांची सुरेख खेळी केली. अनाबेल सदरलँडने सहकारी एकामागोमाग एक तंबूत परतत असतानाही चिवटपणे खेळ करत मॅरेथॉन खेळी साकारली. अनाबेलने १७ चौकारांसह १२९ धावांची दिमाखदार खेळी साकारली. ऑस्ट्रेलियाने ३२३ धावांची मजल मारली. सायली सतघरेने ४ तर क्रांती गौड आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. ऑस्ट्रेलियाला १२५ धावांची आघाडी मिळाली. दुसऱ्या डावात भारतीय फलंदाजांनी सपशेल शरणागती पत्करली. प्रतिका रावळने ६३ धावांची खेळी करत एकाकी झुंज दिली. स्मृती, हरमनप्रीत या अनुभवी खेळाडूंकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती मात्र त्याही झटपट तंबूत परतल्या. भारताचा डाव १४९ धावांतच आटोपला. ऑस्ट्रेलियाकडून ल्युसी हॅमिल्टनने ३ तर अनाबेल सदरलँड, अलाना किंग आणि ॲशले गार्डनर यांनी प्रत्येकी २ विकेट्स पटकावल्या.

ऑस्ट्रेलियाला विजयासाठी २५ धावा करायच्या होत्या. जॉर्जिआ वॉल आणि फोबी लिचफिल्ड यांनी ४.३ षटकात हे लक्ष्य गाठलं. शतकी खेळी आणि ६ विकेट्स पटकावणाऱ्या अनाबेलला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. सामना संपल्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंनी एलिसा हिलीला खांद्यावर बसवून मैदानाची सैर करवली. भारतीय संघाने हिलीचं योगदान लक्षात घेऊन तिला ‘गार्ड ऑफ ऑनर’ दिला. ३५वर्षीय माजी कर्णधार हिलीने ११ कसोटी, १२६ वनडे आणि १६२ टी२० सामन्यात ऑस्ट्रेलियाचं प्रतिनिधित्व केलं. कर्णधारपद आणि यष्टीरक्षण अशी दुहेरी भूमिका बजावली. केवळ ऑस्ट्रेलियाच्याच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरील दिग्गज खेळाडूंमध्ये हिलीचा समावेश होतो.

या दौऱ्यात भारतीय संघाने टी२० मालिका २-१ फरकाने जिंकली. ऑस्ट्रेलियाने तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत निर्भेळ यश मिळवलं. एकमेव कसोटीतही ऑस्ट्रेलियाच दबदबा राहिला.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। सोमवार ।
दि. 09 मार्च 2026 ।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# महापालिका शिक्षकांसाठी एक दिवसीय कार्यशाळा

## माईंडस्पार्कच्या माध्यमातून AI आधारित डिजिटल शिक्षणाची माहिती

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभाग आणि इएल माईंडस्पार्क तर्फे EDTECH (शैक्षणिक तंत्रज्ञान) आणि PAL – PERSONALISED ADAPTIVE LEARNING (वैयक्तिक अनुकूल शिक्षण पद्धती) या विषयावर विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृह येथे करण्यात आले.**



> आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे अत्यंत आवश्यक आहे. माईंडस्पार्क सारख्या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित शिक्षण प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या पातळीनुसार वैयक्तिक मार्गदर्शन मिळते. त्यामुळे गणित व इंग्रजी विषयातील संकल्पना अधिक प्रभावीपणे समजण्यास मदत होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागाच्या माध्यमातून अशा तंत्रज्ञानाधारित उपक्रमांची अंमलबजावणी केल्यास महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व आधुनिक शिक्षण मिळण्यास निश्चितच मदत होईल.
>
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

महापौर रवि लांडगे यांच्या निर्देशानुसार आणि शिक्षण समिती सभापती रविना अंगोळकर, उप आयुक्त ममता शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यशाळेस प्राथमिक शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी संगीता बांगर तसेच समन्वय अधिकारी सुनिता गीते तसेच महापालिका शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.

या प्रसंगी इएल माईंडस्पार्क तर्फे प्रकल्प व्यवस्थापक नमन कुमार तसेच सहाय्यक प्रशिक्षण व्यवस्थापक रीता दाक्षिणी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी माईंडस्पार्क या PAL – PERSONALISED ADAPTIVE LEARNING (वैयक्तिक अनुकूल शिक्षण) सॉफ्टवेअरची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. ही ARTIFICIAL INTELLIGENCE – AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) वर आधारित डिजिटल शिक्षण प्रणाली असून विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या पातळीचा अभ्यास करून त्यानुसार वैयक्तिक मार्गदर्शन करते.

माईंडस्पार्क प्रणाली विद्यार्थ्यांच्या कमकुवत बाजू ओळखून त्यानुसार प्रश्न, सराव आणि शैक्षणिक उपक्रम उपलब्ध करून देते. त्यामुळे गणित व इंग्रजी विषयातील संकल्पना अधिक स्पष्ट होण्यास मदत होते आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला गती मिळते.

या मार्गदर्शन सत्रामध्ये विद्यार्थ्यांमध्ये AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) आणि COMPUTENTIONAL THINKING (संगणकीय विचारप्रक्रिया) या संकल्पनांबाबत जागरूकता निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आला. कार्यक्रमास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या २० शाळांमधून प्रत्येकी दोन प्रतिनिधी सहभागी झाले होते. याशिवाय सुमारे ४० मुख्याध्यापक व शिक्षक या सत्रात उपस्थित होते.

डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी अशा उपक्रमांचा निश्चितच सकारात्मक फायदा होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# ज्येष्ठ अभिनेत्री नयना आपटे यांना 'कोहिनूर नाट्यरत्न पुरस्कार'

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**थोर मराठी नाटककार कै. राम गणेश गडकरी लिखित 'एकच प्याला' या शोकांतिका संगीत नाटकाचा प्रयोग मंगळवार, १० मार्च २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे संपन्न होणार आहे. हा नाट्यप्रयोग सर्वांसाठी विनामूल्य खुला असून, स्वरराज छोटा गंधर्व प्रतिष्ठान तर्फे याचे आयोजन करण्यात आले आहे. स्वरराज छोटा गंधर्व यांची १०८ वी जयंती १० मार्च रोजी असून त्यानिमित्त याचे आयोजन करण्यात आले आहे.**



याच कार्यक्रमात मराठी नाटक व चित्रपट क्षेत्रात अजरामर भूमिका केलेल्या ज्येष्ठ अभिनेत्री नयना आपटे यांना 'कोहिनूर नाट्यरत्न पुरस्कार' देऊन गौरविले जाणार आहे. कोहिनूर ग्रुपचे अध्यक्ष श्री. कृष्णकुमार गोयल हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील अशी माहिती प्रतिष्ठानच्या उपाध्यक्ष सौ. सुचेता अवचट यांनी दिली. या मोफत नाट्यप्रयोगाचा लाभ रसिक प्रेक्षकांनी जरूर घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले.

ज्येष्ठ अभिनेत्री, पद्मश्री नयना आपटे यांच्या मातोश्री कै. शांता आपटे यांनी १९५०-६० च्या दशकात अनेक भूमिका अजरामर केल्या होत्या. हा वारसा घेऊन नयना आपटे यांनी अनेक मराठी नाटके, संगीत नाटके आणि मराठी, हिंदी चित्रपटांत अनेक भूमिका अजरामर केल्या. अंमलदार, एकच प्याला, करायला गेलो एक, देव नाही देव्हाऱ्यात, नवरा माझ्या मुठीत, पुण्यप्रभाव, मानापमान, संशयकल्लोळ, लग्नाची बेडी अशी असंख्य मराठी नाटके आणि चुपके चुपके आणि मिली या हिंदी चित्रपटांतही त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या.

'एकच प्याला' हे थोर मराठी नाटककार राम गणेश गडकरी (गोविंदाग्रज) यांनी लिहिलेले एक अत्यंत लोकप्रिय व अजरामर शोकांतिका संगीत नाटक आहे. १९१७ च्या सुमारास लिहिलेल्या या नाटकाचा मुख्य विषय मद्यपानाचे भीषण दुष्परिणाम आणि त्यामुळे होणारा सुखी संसाराचा विध्वंस हा आहे. या नाटकाचे पहिले सादरीकरण २० फेब्रुवारी १९१९ रोजी बडोद्यात गंधर्व नाटक मंडळीने केले. या नाटकात मद्यपानाचे दुष्परिणाम, कौटुंबिक जीवन आणि मानवी नातेसंबंधांमधील भावनिक चढ-उतार अतिशय प्रभावीपणे दाखवण्यात आले आहेत.

स्वरराज छोटा गंधर्व प्रतिष्ठान तर्फे अनेक संगीत नाटके करून, कलाकारांना घेऊन बसवली जातात व संपूर्ण महाराष्ट्रात त्याचे प्रयोग केले जातात. यामध्ये सन्मिता धापटे-शिंदे (सिंधू), अभिषेक अवचट (सुधाकर), चंद्रकांत मुळगुंदकर (तळीराम), पूजा पारखी (गीता), निलेश दातार (भगीरथ), सौरभ पाणदरे (रामलाल) यांच्या प्रमुख भूमिका असून एकूण १२ कलाकार आहेत.

# मालमत्ताकर अभय योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## विलंब दंडात 90% सवलतीमुळे सहा दिवसांत सुमारे 20 कोटींचा भरणा

**महाईन्यूज । पिंपरी चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील थकबाकीदारांना मालमत्ताकराचे बिले भरता यावीत म्हणून विलंब दंडात तब्बल 90 टक्क्यांची सवलत देण्यात आली आहे. त्या अभय योजनेला थकबाकीदारांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. योजना सुरू झाल्यापासून महापालिका तिजोरीत तब्बल 20 कोटी रुपयांचा भरणा झाला आहे. तर, तब्बल 7 हजार 400 थकबाकीदारांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे.**




शहरातील 2 लाख 12 हजार 440 मालमत्ताधारकांनी 28 फेब्रुवारीपर्यंत मालमत्ताकर भरलेला नव्हता. थकीत मालमत्ताकर वसुलीस गती देण्यासाठी 1 मार्चपासून महापालिकेच्या करसंकलन विभागाकडून अभय योजना सुरू करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत निवासी, बिगरनिवासी, औद्योगिक व मोकळ्या जागा यांची थकबाकी एकरकमी भरल्यास विलंब दंडावर 90 टक्के सवलत दिली जात आहे. ती योजना 31 मार्चपर्यंत आहे.

त्या दोन 2 लाख 12 हजार 440 मालमत्ताधारकांनी बिल भरलेले नाही. निवासी मालमत्ता सर्वाधिक 1 लाख 80 हजार 27 इतक्या असून, थकबाकी तब्बल 404 कोटी 75 लाख इतकी आहे. तर, बिगरनिवासी 18 हजार 284 मालमत्ताधारकांकडे एकूण 341 कोटी 58 लाखांची थकबाकी आहे. पाच हजार 233 मिश्र मालमत्ताधारकांकडे 5 हजार 233, एक हजार 341 औद्योगिक मालमत्ताधारकांकडे 18 कोटी 2 लाख, पाच हजार 308 मोकळ्या जमीनधारकांकडे एकूण 374 कोटी 41 लाख आणि इतर 247 जणांकडे 40 लाखांची थकबाकी आहे.

योजना लागू झाल्यापासून थकबाकीदारांकडून संपूर्ण बिल भरण्यात येत आहे. रविवार (दि.1) पासून शुक्रवार (दि.6) पर्यंत सहा दिवसांत तब्बल 7 हजार 378 मालमत्ताधारकांनी एकूण 19 कोटी 89 लाख रुपयांचा भरणा केला आहे. त्यांना विलंब दंडात मोठी सूट मिळाली आहे.

### संपूर्ण बिल भरून सवलतीचा लाभ घ्या

पाच, दहा तसेच पंधरा वर्षे थकलेली बिले नागरिक भरून अभय योजनेतील मोठ्या सवलतीचा लाभ घेत आहेत. दररोज 5 कोटी रुपयांचा भरणा होत आहे. शेवटच्या टप्प्यात त्यात मोठी वाढ होण्याची अपेक्षा आहे. नागरिकांना बिल भरण्यासाठी सर्व 18 विभागीय कार्यालयातील कॅश काउंटर सुटीच्या दिवशीही खुले ठेवण्यात आली आहेत. ही अभय योजना 31 मार्च महिन्यापुरती मर्यादित आहे. नागरिकांनी थकबाकीसह संपूर्ण बिल भरून भरघोस सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपायुक्त सचिन पवार यांनी केले आहे.

---

# यशवंतभाऊ भोसले यांच्या नेतृत्वाखाली 'जागतिक शांतता' रॅली

**महाईन्यूज । पिंपरी चिंचवड**

**आखाती देशातील युद्ध थांबवावे व जगात शांतता नांदावी या करीता संत तुकाराम नगर येथे राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांच्या नेतृत्वाखाली "जागतिक शांतता" आव्हान रॅली संपन्न झाली.त्यांनी संत तुकाराम महाराज हॉल येथे श्रमिकांना संबोधित केले.या रॅलीमध्ये शेकडो श्रमिक व पिंपरी चिंचवड वाशीय सहभागी झाले होते. रॅली वेळी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता.**




संत तुकाराम महाराज पुतळ्याचे दर्शन घेऊन रॅलीला सुरूवात करण्यात आली. त्यानंतर पंचशील बौद्ध विहारांमध्ये भगवान गौतम बुद्धांना वंदन करून पुढे श्री गणेश मंदिरात दर्शन घेतले.सर्व जाती धर्माच्या स्थळांना भेट देऊन जागतिक शांततेसाठी प्रार्थना करण्यात आली. मृत्यू झालेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करून राष्ट्रगीताने संत तुकाराम महाराज हॉल येथे रॅली ची सांगता झाली.

यावेळी भाजपाचे शहर पदाधिकारी मंगेश धाडगे, मुन्ना बाविस्कर, दिनेश पाटील, दिपक पाटील, नंदू कदम, अमोल घोरपडे, शंकरराव शितोळे, ओंकार जोखारे, राहुल शितोळे, लता पाटील, अंकुश वाघमारे ,स्वानंद राजपाठक, ईश्वर गायकवाड, शंकरराव गावडे, सतीश एरंडे यांनी रॅलीचे आयोजन केले होते.

जागतीक शांतता रॅलीला संबोधित करताना कामगार नेते यशवंतभाऊ भोसले म्हणाले की, अमेरिकेने इजराइलच्या साह्याने इराणवर जो आघात केला त्यामुळे इराणचे प्रमुख नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला. हवाई तळाची जागा ज्या देशाने युद्धासाठी उपलब्ध करून दिली त्या आखातातील सर्वच देशांना याचे परिणाम भोगावे लागले आहेत. भारतालाही याचे परिणाम मोठ्या प्रमाणावर जाणवले आहेत कारण अमेरिका, यूएई,दुबई सहित सर्वच आखाती देशात लाखो भारतीय नागरिक अडकले आहेत. अडकलेल्या भारतीय नागरिकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देशात सुखरूप आणण्यासाठी आवाहन केल्यानंतर त्यांच्या म्हणण्यानुसार इराणन सहित इतर देशांनी युद्ध थांबवून विमानाने भारतीय सुखरूप देशात पोहोचले. याचे सर्व श्रेय भारत सरकारच्या परराष्ट्र धोरणाला व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जाते. भारत सरकारने अवलंबलेल्या परराष्ट्र धोरणाचा चांगला परिणाम युद्धाच्या काळात दिसून येत आहे. कारण जगात युद्ध चालू असताना भारत स्थिर असून नागरिक शांतपणे झोप घेत आणि दैनदिन कार्य करत आहेत.

युद्ध वाढल्यास याचे परिणाम सर्व जगाला भोगावे लागतील. बाजारातील सर्वच जीवन आवश्यक वस्तू महागतील याचा परिणाम भारतीयांना भोगावा लागेल. युद्धामध्ये निष्पाप नागरिकांचा नाहक बळी जात आहे. जगावर आर्थिक संकट निर्माण झाले असून त्यामुळे युद्ध थांबावे व जगात शांतता प्रस्थापित व्हावी या हेतूने भाजप प्रणित राष्ट्रीय श्रमिक आघाडी तसेच शेकडो श्रमिकांच्या वतीने जगातील पहिली भव्य शांतता आवाहन रॅली काढण्यात आली. या रॅलीचा आदर्श घेऊन जगातील सर्वच देश जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी सहकार्य करतील. शांतता प्रस्थापित करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुढाकार घ्यावा. आठ दिवसात युद्ध थांबेल अशी आशा करून "युद्ध नको शांतता हवी" यासाठी जगातील पहिली जागतिक शांतता रॅली पिंपरी चिंचवड शहरात काढण्यात आली. परराष्ट्र धोरण योग्य राबवल्या मुळे व शांतता प्रस्थापित केल्या मुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करण्यात आले.तसेच केंद्र सरकार व राज्य सरकारचा अभिनंदन ठराव करण्यात आल्याचे मत कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी व्यक्त केले.

# डॉ. सुशांत पाटील ग्रुपतर्फे शिवजयंती उत्साहात साजरी

## व्याख्यान, पोवाडे, मर्दानी खेळ आणि ढोल-ताशांच्या गजरात कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**महाईन्यूज । पुणे**

**डॉ. सुशांत पाटील ग्रुपच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भव्य स्वरूपात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला डॉ. सुशांत पाटील सर आणि ॲड. अनुजा पाटील मॅडम यांचे दूरदर्शी नेतृत्व, मार्गदर्शन आणि भक्कम पाठिंबा लाभला. त्यांच्या प्रेरणेमुळे हा शिवजयंती उत्सव अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने पार पडला.**




या संपूर्ण कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून CREATIVE AND CULTURAL DIRECTOR प्रा. श्रेयस देशपांडे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आणि संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन व समन्वय केला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री. विद्यानंद मानकर सर उपस्थित होते. तसेच मान्यवर पाहुणे आणि शिवव्याख्याते श्री. राहुल मारोती नलावडे उर्फ रायबा यांनी आपल्या प्रभावी आणि प्रेरणादायी भाषणातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि विचार अत्यंत प्रभावीपणे मांडले. त्यांच्या ओजस्वी शब्दांनी संपूर्ण प्रेक्षकवर्ग भारावून गेला.

या कार्यक्रमासाठी सातत्याने मार्गदर्शन आणि सहकार्य करणारे डॉ. सुरेश माळी सर, डॉ. सुरेश शिर्भादुरकर सर, डॉ. मेघना भिलारे मॅडम, श्री. प्रदीप खांडवे सर, श्री. संजय भोर सर, डॉ. योगेश गुरव सर, श्री. नामदेव वेताळे सर, डॉ. अल्पना अडसूळ मॅडम, डॉ. दिपन्निता मोंडल मॅडम, प्रा. योगेश नागवेकर सर तसेच सर्व विभागप्रमुख आणि CULTURAL COMMITTEE HEADS यांचेही विशेष आभार मानण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. देखावे सजावट समितीत प्रा. संदेश पाटील, प्रा. चैत्राली सरतापे आणि प्रा. सतीश असणे यांनी काम पाहिले. नाटक, पोवाडा व भाषण समितीमध्ये डॉ. प्रवीण लाटणे, प्रा. स्वप्नील मोरे आणि प्रा. महेश लोहार यांनी समन्वय साधला. कला दालन (ART GALLERY) प्रा. प्रियंका भिक्कड आणि प्रा. अनुराधा बोबडे यांनी साकारले. शिवजयंती रॅली समितीत श्री. किरण माळी, श्री. अतुल धुमाळ आणि श्री. विठ्ठल राऊत यांनी काम केले. शिवअभिषेक समितीत श्री. सिद्धेश जाधव आणि श्री. सच्चितानंद श्रीगंधे यांचा सहभाग होता. स्टेज समिती (TECHNICAL CAMPUS) प्रा. भावना शिंदे यांनी पाहिली. क्रीडा समितीत श्री. किरण माळी आणि पूनम अभंग यांनी काम केले. आतिथ्य (HOSPITALITY) समितीत प्रा. राजहिंदवी साठे आणि प्रा. मधुरा मॅडम यांनी जबाबदारी पार पाडली.

मीडिया टीम आणि डेकोरेशनचे काम उन्मेष कोरडे आणि मंगेश ढोले यांनी केले. सोशल मीडिया समन्वयक म्हणून निखिल लाडे यांनी काम पाहिले. कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरलेले आरंभ ढोल-ताशा पथक आणि त्यांचे प्रमुख समन्वयक सिद्धू सर यांचेही विशेष आभार मानण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मर्दानी खेळांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची जिवंत झलक प्रेक्षकांसमोर उभी केली.

कार्यक्रमाच्या यशामागे विद्यार्थ्यांचेही मोठे योगदान राहिले. स्वयंसेवक म्हणून प्रणव चिंधे, स्नेहा चव्हाण, हर्षाली पवार, सार्थक, देवा निंबाळकर, कपिश केदारी, यश दोमसे, शिवम लहसे आणि स्वानंद जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल खीचर आणि प्रफुल्ल चव्हाण यांनी प्रभावीपणे केले.

तसेच मंचावर भाषण, नाटक, नृत्य सादर करणारे विद्यार्थी, छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांच्या सुंदर प्रतिकृती तयार करणारे विद्यार्थी तसेच चित्रकला, स्केचेस, पेंटिंग्स आणि रांगोळी सादर करणाऱ्या सर्व कलावंत विद्यार्थ्यांचेही विशेष कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये हाऊसकीपिंग स्टाफ आणि शिपाई वर्गाचेही मोलाचे योगदान राहिले.



# Grand Celebration of Shiv Jayanti by Dr. Sushant Patil Group

**MahaEnews I PUNE**

**SHIV JAYANTI OF CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ WAS CELEBRATED WITH GREAT ENTHUSIASM AND GRANDEUR BY THE DR. SUSHANT PATIL GROUP. THE EVENT WAS SUCCESSFULLY ORGANIZED UNDER THE VISIONARY LEADERSHIP, GUIDANCE, AND STRONG SUPPORT OF DR. SUSHANT PATIL SIR AND ADV. ANUJA PATIL MADAM.**



The entire event was coordinated by Prof. Shreyas Deshpande, Creative and Cultural Director, who played a key role in planning and executing the program successfully.

The chief guest for the program was Shri Vidyanand Mankar Sir. The distinguished guest and Shiv lecturer Shri Rahul Maroti Nalawade, popularly known as Rayba, delivered an inspiring speech highlighting the life, ideology, and history of Chhatrapati Shivaji Maharaj.

Special thanks were expressed to Dr. Suresh Mali Sir, Dr. Suresh Shirbhadurkar Sir, Dr. Meghna Bhilare Madam, Shri Pradeep Khandwe Sir, Shri Sanjay Bhor Sir, Dr. Yogesh Gurav Sir, Shri Namdev Vetale Sir, Dr. Alpana Adsul Madam, Dr. Dipannita Mondal Madam, Prof. Yogesh Nagvekar Sir, along with all Heads of Departments and Cultural Committee Heads for their valuable support.

Various committees contributed significantly to the success of the event. The decoration committee included Prof. Sandesh Patil, Prof. Chaitrali Saratape, and Prof. Satish Asane. The drama, powada, and speech committee included Dr. Pravin Latane, Prof. Swapnil More, and Prof. Mahesh Lohar. The Art Gallery was organized by Prof. Priyanka Bhikkad and Prof. Anuradha Bobde. The Shiv Jayanti rally committee included Shri Kiran Mali, Shri Atul Dhumal, and Shri Vitthal Raut. The Shiv Abhishek committee included Shri Siddhesh Jadhav and Shri Sachchitanand Shrigandhe. The stage committee for the Technical Campus was handled by Prof. Bhavana Shinde. The sports committee included Shri Kiran Mali and Poonam Abhang. The hospitality committee included Prof. Rajhindavi Sathe and Prof. Madhura Madam.

Media and decoration work was handled by Unmesh Korade and Mangesh Dhole, while social media coordination was managed by Nikhil Lade.

A major highlight of the celebration was the Aarambh Dhol Tasha Pathak led by chief coordinator Siddu Sir.

Students also performed traditional Mardani Khel, showcasing the bravery of Chhatrapati Shivaji Maharaj.

Student volunteers including Pranav Chindhe, Sneha Chavan, Harshali Pawar, Sarthak, Deva Nimbalkar, Kapish Kedari, Yash Domse, Shivam Lahase, and Swanand Joshi contributed significantly to the successful organization of the event.

